प्रकरण सहावे

# विशेष शिबीर संकल्पना व ग्रामीण विकास

प्रकरण सहावे

# विशेष शिबीर- संकल्पना व ग्रामीण विकास

६.१ प्रस्तावना

६.२ विशेष शिबिराची संकल्पना

६.३ विशेष शिबिरातील मथळ्यांचा (संकल्पना) आढावा

६.४ विशेष शिबिराची उद्दिष्टे

६.५ विशेष शिबिरातील कार्यक्रम प्रकार

६.६ विशेष शिबीर व ग्रामीण विकास

प्रकरण सहावे

# विशेष शिबीर- संकल्पना व ग्रामीण विकास

## ६.१ प्रस्तावना :

विशेष शिबीर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा आत्मा असून वर्षभरातील कार्यक्रमांचा एक महत्त्वाचा भाग आहे. विशेष शिबीर म्हणजे विद्यार्थ्यांसाठी समाजसेवेची पर्वणीच होय. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे खेड्यामध्ये सात दिवसाचे विशेष शिबीर आयोजित करण्यात येते. ग्रामीण विकासाच्या संदर्भात सात दिवसाच्या कालावधीत महत्त्वपूर्ण कामे केली जात असतात. यामध्ये २४ तासाचे नियोजन केले जात असते, पहाटे योगा, सकाळी फराळ व श्रमदान व दुपारी भोजन व प्रबोधन विषयक कार्यक्रम व संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारचे नियोजन असते. विशेष शिबिरात युवक उत्साही असतात. विद्यार्थी खेड्यातील असो अथवा शहरी भागातील असो शहरी भागात वाढलेले विद्यार्थी खेड्यांमध्ये येऊन अगदी ग्रामस्थांशी एकरूप होऊन अगदी तळमळीने काम करत असतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांची समाजसेवेविषयी असणारी तळमळ सर्वांच्या लक्षात येते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात ग्रामीण विकासासंदर्भात जे महत्त्वाची कामे विद्यार्थ्यांनी केलेली आहेत ती कामे व आठवणी कधीही विसरू शकत नाही. विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरात काम करण्याची संधी मिळणे हा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मोलाचे योगदानच होय. 'विशेष शिबिरात विद्यार्थ्यांना एकत्र राहणे, एकमेकांच्या अनुभवाची देवाण-घेवाण करणे, सतत सामाजिक गोष्टींची चर्चेद्वारे विचार-विनिमय करणे, सामाजिक प्रश्नांची चर्चा करून ते प्रश्न, समस्या, अडचणी यांवर उपाय विद्यार्थ्यांनीच शोधतात.'[१] यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता वाढते. समाजाविषयी असणारी विद्यार्थ्यांची बांधिलकीत आणखी वाढ होते. 'the N.S.S. Special camp has a special appeal as it provides unique opportunities to the students to participate in meaning outdoor programmes and use their energy and idealism for community work and in nation building. The camp provides an opportunity together harmoniously with groups of students drawn from different areas and belonging to different castes and different social,

religious and language backgrounds. It helps in developing among students qualities like character, courage, confidence, comradeship, decision-making and democratic leadership and attitude.'[२] राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विशेष शिबिरातून विद्यार्थ्यांच्या विकासाबाबतच्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी शिकायला मिळतात. याबरोबरच ग्रामीण भागाचा ही विकास होत असतो. 'युवक हा ग्रामीण पुनर्रचनेसाठी, राष्ट्रीय एकात्मतेसाठी, दुष्काळाशी झुंज देण्यासाठी, साक्षरतेसाठी, भूकंपपीडितांना मदत करण्यासाठी आणि दिन दुबळ्यांचे हात प्रबळ करण्यासाठी आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची विशेष शिबिरे म्हणजे युवाशक्तीच्या केवळ आविष्काराचे दर्शन नव्हे तर युवाशक्तीचे महानत्व सिद्ध करणारे आहे.'[३] विशेष शिबिराच्या माध्यमातून युवकांना अष्टपैलू बनविले जात असते. विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेत काम करतांना अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते त्यामुळे विद्यार्थी परिपूर्ण बनत असतो. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत काम करतांना स्वतःचा विकास करत समाजाचा विकास करत असतात. 'विद्यार्थी जेंव्हा खेड्यात जाऊन न लाजता काम करतात तेंव्हा त्या गावातील गावकऱ्यांच्या मनात परिवर्तनाची चाहूल सुरु होते. विशेष शिबिरामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात जाऊन समाजाची सेवा करण्याची, प्रश्न जाणून घेण्याची अभूतपूर्व संधी मिळते.'[४] राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी समाज सेवा करत गावकऱ्यांना प्रेरणा देत असतात. ग्रामीण भागात आज अनेक समस्या गंभीर बनत आहेत. विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील अनेक समस्या नाहीशा झालेल्या आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे नियोजन करीत असतानाच समाजातील दुर्बल घटकाच्या समस्यांचा विचार केला जात असतो. याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पीडितांच्या अनेक समस्या सोडविलेल्या आहेत. ग्रामीण भागातील पिडीत लोकांचे प्रश्न समजावून घेऊन विद्यार्थ्यांनी त्या समस्या नाहीस्या केल्या जात आहेत.

लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे १९९३ मध्ये झालेल्या भूकंपामुळे प्रचंड हानी झाली. हजारो लोकांना जीव गमवावा लागला होता. त्यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेनी भूकंपग्रस्ताच्या मदतीसाठी आटोकाट प्रयत्न केले गेले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून भूकंपग्रस्त खेड्याचे पुनर्वसन करण्याचा ध्यास घेतला. त्यावेळी लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाचे या

महत्त्वाच्या कामासाठी विशेष सहकार्य लाभले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केलेले श्रमदान, दानशूर व्यक्तींनी दाखवलेले दातृत्व, विद्यापीठ व महाविद्यालयानी दिलेली साथ यामुळे चलबुर्गा येथे जातपात विरहीत एका आदर्श अशा ८० घरांची वसाहत साकार झाली.

## ६.२ विशेष शिबिराची संकल्पना :

विशेष शिबीर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा अविभाज्य घटक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे जास्तीत जास्त उद्दिष्टे हे विशेष शिबिरातून साध्य होत असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचा सर्वात लोकप्रिय कार्यक्रम म्हणजे विशेष शिबीर होय. विशेष शिबिरात विद्यार्थ्यांचा उत्साहानी सहभाग असतो. राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर हे ग्रामीण भागात आयोजित केली जात असतात. विशेष शिबीर हे निवासी असते त्यामध्ये २४ तासाचे नियोजन केलेले असते. राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर हे सात दिवसाचे असून सात दिवसात ग्रामीण विकासाच्या संदर्भात अनेक कार्यक्रम राबविले जात असतात. विशेष शिबिरात श्रमदानाला खूप महत्त्व आहे. स्वयंसेवक श्रमदानाच्या माध्यमातून अनेक विकास विषयक कार्यक्रम पार पडले जात असतात. विशेष शिबिरातील प्रामुख्याने श्रमदान, बौद्धिक सत्र, सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जात असतात. विशेष शिबिराच्या श्रमदानातून समाजसेवेचे संधी मिळते, बौद्धिक सत्रातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व गावकऱ्यांना माहिती मिळते, सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्वतःचे प्रबोधन व विकास तर गावकऱ्यांना प्रबोधन व जागृती होत असते. याबरोबरच सर्व जाती धर्मांचे विद्यार्थी एकत्र राहतात, विचारांची देवाण घेवाण करतात, सामाजिक प्रश्नावर चर्चा करतात. यातून विद्यार्थ्यांना खूप काही शिकता येते. विशेष शिबिरात केंद्र सरकारने एक संकल्पना दिलेली असते त्या संकल्पनेवर आधारित श्रमदान करत असतात. ग्रामीण भागात जाऊन सात दिवस ग्रामीण विकासाच्या संदर्भात कामे करणे, त्यातून शिकणे व समाजाला शिकवणे म्हणजे विशेष शिबीर होय.

## ६.३ विशेष शिबिरातील थीम (संकल्पना) चा आढावा :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष कार्यक्रमांच्या उपक्रमासंदर्भात केंद्र सरकारने दर वर्षांनी किंवा काही वर्षांनी एक थीम देण्यात येते. या दिलेल्या थीम वरच संपूर्ण भारतात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांची अंमलबजावणी केली जात असते. 'राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम हे प्रामुख्याने समाजासाठी उपयुक्त ठरतील अशा गरजावर आधारित आखले जातात. त्या त्या काळात समाजाला कोणत्या समस्या भेडसावत आहेत हे पाहीले जाते.'[५] आज पर्यंतचे काही प्रमुख कार्यक्रम खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | थीम / संकल्पना | वर्ष |
|---|---|---|
| १. | दुष्काळा विरुध्द युवकांची झुंज | १९७२-७३ |
| २. | घाण आणि रोगराई विरुध्द युवकांचे अभियान | १९७३-७४ |
| ३. | वनसंवर्धन आणि वृक्षारोपणासाठी युवक | १९७४-७५ |
| ४. | आर्थिक विकासासाठी युवक | १९७५-७६ |
| ५. | ग्रामीण पुनर्रचनेसाठी युवक | १९७७-८४ |
| ६. | साक्षरता अभियानासाठी युवक | १९८५-९४ |
| ७. | हरीयालीसाठी युवक | १९९४-२००० |
| ८. | आपत्ती व्यवस्थापन व जलसंधारणासाठी युवक | २०००-२००६ |
| ९. | समृध्द भारतासाठी सुदृढ युवक | २००६-२००९ |
| १०. | पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी युवक | २००९ पासून |

## ६.४ विशेष शिबिराची उद्दिष्टे :

राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्र बिंदू सेवा व युवा हा आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा महत्त्वाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे व समाजाचा विकास घडून आणून विधायक कार्य पार पाडणे. राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांना माणुसकीचे ज्ञान मिळते व भविष्याचे सुजाण नागरिक घडवले जातात. राष्ट्रीय सेवा योजना केवळ कार्यक्रम नाही तर सामाजिक संस्कार व विचार आहे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

- विशेष शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी निर्माण करून देणे.
- विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडून आणणे.
- ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे.
- राष्ट्र उभारणी साठी कार्यक्षम व स्वावलंबी नागरिक निर्माण करणे.
- गावात एकता व सामाजिक सलोखा निर्माण करणे.
- ग्रामीण जनतेतील जुन्या रूढी परंपरा यात परिवर्तन करून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे.
- ग्रामीण युवकात कार्यक्षम नेतृत्व निर्माण करणे.
- ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे. व शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करणे.
- ग्रामीण भागात दळणवळण व वाहतूक सुविधा निर्माण करून देणे.
- जमीन सुधारणा करणे व जमीन वापरात आणणे.
- गावात स्वच्छता ठेवणे व लोकांना स्वच्छते बदल आस्था निर्माण करणे.
- शेती क्षेत्राचा विकास करणे व शेतीचे परीक्षण करणे.
- ग्रामीण भागातील लोकांची सांस्कृतिक व वैचारिक पातळीत वाढ करणे.
- गावातील लोकांची व्यसनाधीनता कमी करण्या संदर्भात जनजागृती करणे.
- ग्रामीण भागातील जातीभेद व अस्पृश्यतेचा नायनाट करणे.

- ग्रामीण जनतेचे राहणीमान सुधारणे.
- सार्वजनिक आरोग्याची निगा राखणे.
- ग्रामीण महिलांचा विकास करणे.
- गावातील तंटे गाव पातळीवरच सोडवणे. ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणे.
- ग्रामीण जनतेचे दारिद्र्य दूर करणे.
- लोकांना घरे उपलब्ध करून देणे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून वरील कामे केली जात असतात.

## ६.५ विशेष शिबिरातील कार्यक्रमांचे प्रकार :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात दिवस भर कार्यक्रमांचे नियोजन केलेले असते. त्यानुसार विविध प्रकारचे कार्यक्रम आखले जात असतात. कार्यक्रमांचे विविध प्रकार खालील प्रमाणे आहेत.

### १) योगा :

विशेष शिबिरातील कार्यक्रमांची सुरुवात ही योगा व व्यायामाने होत असते. योगा व व्यायामाने बौद्धिक व शारीरिक विकास होतो. शरीर सुदृढ राहण्यास मदत होते त्यामुळे विशेष शिबिरात व्यायामाचे महत्त्व सांगून व्यायामाची सवय लावली जात असते. याबरोबरच व्यायाम व योगा जीवनभर करण्याचा सल्ला दिला जात असतो.

### २) श्रमदान :

श्रमदान हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा अविभाज्य घटक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात श्रमदानाला अतिशय महत्त्व आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी विशेष शिबिराच्या  माध्यमातून दत्तक गावात सात दिवसाचे निवासी शिबिरात सहभाग संडास चे खड्डे खंदतात, शोष खड्डे काढणे, विविध प्रकारचे बंधारे बांधणे, रस्ता दुरुस्ती व रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यासाठी खड्डे खोदंने इत्यादी श्रमदान विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करत असतात.

### ३) बौद्धिक कार्यक्रम :

राष्ट्रीय सेवा योजनेतील विशेष शिबिराच्या माध्यमातून बौद्धिक कार्यक्रमाअंतर्गत वेगवेगळे सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक विषयावर परिसंवाद आयोजित केले जातात. बौद्धिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भारतीय राजघटनेतील मानवता, देश प्रेम, एखादी घडलेली सामाजिक समस्या इत्यादी विषयावर विद्यार्थ्यात हा विषय चर्चे साठी ठेवले जाते, या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास व अभ्यासू वृत्ती निर्माण होते. विशेष शिबिरातून बौद्धिक विचारांचा प्रसार व्हावा. न्युनगंड,

राग, व्देष, लोभ इ. दुर्गुणाचे उच्चाटनही झाले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेतील बौद्धिक कार्यक्रम हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी व दत्तक घेतलेल्या गावातील नागरिकांच्या प्रबोधनासाठी असते.

**४) जनजागृती व प्रबोधन विषयक कार्यक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातून वैज्ञानिक दृष्टीकोना संदर्भात व स्वच्छतेविषयी प्रबोधन, नैसर्गिक पर्यावरण साधन संपती विषयी जागृती करण्यात येते यामुळे ग्रामीण लोकांची मानसिकता बदलते त्यामुळे ग्रामीण विकासात प्रत्यक्षात जागृती निर्माण होऊन विकास होतो. ग्रामीण जनतेत एकोपा व बंधुभाव वाढतो त्यामुळे स्वच्छ गाव, निर्मल ग्राम व तंटामुक्त गावा करिता प्रेरणा मिळते.

**५) सांस्कृतिक कार्यक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी संध्याकाळची वेळ राखून ठेवलेली असते कारण, गावातील लोक संध्याकाळी शेतातून घरी परततात. सांस्कृतिक कार्यक्रमाला गावकऱ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत असतो. म्हणजेच सांस्कृतिक कार्यक्रम गावातील लोकांनी आवडीने पाहतात. सांस्कृतिक कार्यक्रमातून समाजप्रबोधनाचे कार्यक्रम सुद्धा आयोजित केली जात असतात. सांस्कृतिक कार्यक्रमातून एखाद्या सामाजिक समस्या बाबत सुद्धा प्रकाश टाकला जात असतो.

**६) सर्वेक्षण :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी सबंधित गावाचे सर्वेक्षण करतात. त्यामध्ये शैक्षणिक, शेती, पीक पाणी, आर्थिक, आरोग्य, सामाजिक, ऐतिहासिक, भौगोलिक आढावा नजरे समोर आल्यानंतर त्यांच्या गरजेनुसार विविध उपक्रम आखले जातात.

## ६.६ विशेष शिबीर व ग्रामीण विकास :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून संबंधित गावाचा सर्वांगीण विकास करण्याची नैतिक जबाबदारी स्विकारली जात असते. संबंधित गावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनीट मार्फत सात दिवसाच्या शिबिरात ग्रामीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जात असतात. ग्रामीण भागात ज्या समस्या आहेत त्या नाहीस्या करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असतात. विशेष शिबिराच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेनी लोकसहभागाबरोबरच शासनाचा ही सहभाग घेतलेला आहे. विशेष शिबिराच्या माध्यमातून सात दिवसात ग्रामीण विकासाची कामे करणे म्हणजे गाव विकासाबद्दल लोकांच्या मनात आस्था निर्माण करून गावाच्या विकासात सातत्य ठेवणे होय.

### १) स्वच्छता अभियान :

राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वच्छतेच्या बाबतीत खूपच जागरूक असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वच्छते विषयक काम करताना कधीच घाणीची किळस येऊ दिलेली नाही व लाजले देखील नाहीत. ग्रामीण भागात रस्त्यावर घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असतांना देखील ती घाण नाहीशी करण्यात स्वयंसेवक चागले पुढाकार घेतलेले दिसून येतात. ग्रामीण भागात स्वछतेविषयक काम करताना लोकांना विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचा हेवा वाटतो. इतकी मोठी शिकवण राष्ट्रीय सेवा योजनेंनी विद्यार्थ्यांना दिलेली आहे. ग्रामीण भागात आज ही ग्रामपंचायती मार्फत गावातील रस्त्याची दुरुस्ती व साफ सफाई केली जात नाही.

### २) आरोग्य विषयक शिबिरे :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून आरोग्य विषयक कार्यक्रम आखले जात असतात. आरोग्य विषयक कार्यक्रमात प्रामुख्याने प्लस पोलिओ लसीकरण मोहीम, स्वाईन फ्ल्यू, मलेरिया, डेंग्यु, चिकन गुनिया, कावीळ, कॉलरा, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तगट तपासणी शिबीर, सर्वरोग निदान शिबीर, एड्स जनजागरण इ. रोगाविषयी तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने आयोजित केली जात असतात. समाज व समाजाचे आरोग्य हा ग्रामीण विकासातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

**३) हागणदारी मुक्त गाव :**

आज भारतात प्रत्येक ५ व्यक्ती पैकी ४ व्यक्ती उघड्यावर शौचास बसतात. ही खूप मोठी शोकांतिका आहे. समाजाच्या आरोग्यास अपायकारक आहे. ग्रामीण भागात उघड्यावर शौचास बसल्याच्या परिणामांची माहिती नसल्यामुळे अनेक परिणामाना सामोरे जावे लागते. '२००६ मध्ये १४०० कार्यक्रम अधिकाऱ्यांना निर्मलग्राम योजनेचे यशस्वी अंमलबजावणीसाठी 'स्वच्छतादूताचे' प्रशिक्षण दिले. या प्राध्यापकांनी आपआपल्या महाविद्यालयातील प्रत्येक ४० याप्रमाणे ५६००० विद्यार्थी स्वच्छतादूत तयार केले. त्यांनी ठरवून दिलेल्या तत्वानुसार स्वच्छतादूताचे प्रशिक्षण दिले गेले. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभर राष्ट्रीय सेवा योजनेचे हागणदारीमुक्तीचे वारे वाहायला लागले. खेड्यामध्ये केवळ आरोग्यावर अतोनात खर्च होत असतो. हा खर्च वाचवायचा असेल किंवा आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळायचे असतील तर १००% हागणदारीमुक्तीला पर्याय नाही.'[६]

**४) पाणलोट क्षेत्र विकास :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्र विकासासाठी विद्यार्थ्यांनी खूप सहकार्य केलेले आहे. पावसाचे पाणी माळरानावरून वाहून जावू नये, यासाठी छोटे मोठे बांध राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी बांधलेले आहेत. यामुळे पाणी जमिनीत मुरूल्यामुळे बारा महिने पाण्याची कमतरता भासत नाही.

**५) ग्राम सर्वेक्षण :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सबंधित गावाचे सर्वेक्षण करतात. त्यामुळे दत्तक घेतलेल्या गावाचा शैक्षणिक, शेती, पीक पाणी, आर्थिक, आरोग्य, सामाजिक, ऐतिहासिक, भौगोलिक आढावा नजरे समोर आल्यानंतर त्यांच्या गरजेनुसार विविध उपक्रम आखले जातात. म्हणजेच सर्वेक्षणातून गावाचा अभ्यास करून विकासाचा आढावा घेतला जात असतो. त्यानंतर कोणते उपक्रम राबवावेत हे ठरवलं जात असत.

**६) महिला आरोग्य शिबीर व बचत गट निर्मिती :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यामतून स्वयंसेवकांनी बचत गटाविषयी महिलांना माहिती दिली जाते. याबरोबरच बचत गटावर व्याख्याने आयोजित केली जात असतात. या मुळे ग्रामीण भागातील महिलांना बचत गटाचे महत्त्व लक्षात येते. ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय करू लागल्या याबरोबरच स्वावलंबी पण झाल्या. 'बचत गटामुळे स्त्रियांना घराच्या उंबऱ्यावरून बाहेर येता आले, माणूस म्हणून वावरायला संधी मिळाली व नव्या जगाची ओळखही होऊ लागली.'[७]

**७) पशुरोग निदान शिबीर :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात पशु रोग चिकित्सा शिबीर आयोजित केली जात असते. या माध्यमातून तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने गावातील जनावरांची तपासणी करून औषध- गोळ्या दिल्या जातात. पशु रोग चिकित्सा शिबिराला गावकऱ्यांचे भरपूर सहकार्य मिळत असते.

**८) स्मशानभूमीची स्वच्छता :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावातील स्मशानभूमीची स्वच्छता केली जात असते. गावातील लोक स्मशानभूमीची स्वच्छता तर करतच नाही पण स्मशानभूमीमध्ये जायायला भितात व गावात जर कोणाचा मृत्यू झाला तर स्मशानभूमी पर्यंत जाण्यासाठी पाऊल वाट तयार करतात. पण राष्ट्रीय सेवा योजनेची संपूर्ण स्मशानभूमीची स्वच्छता करतात. अशा केलेल्या कार्याचा गावकऱ्यांना पण हेवा वाटतो.

**९) अंधश्रद्धा निर्मुलन व वैज्ञानिक दृष्टीकोन :**

विशेष शिबिराच्या माध्यमातून अंधश्रद्धानिर्मुलना विषयी जनजागृती, अंधश्रद्धेचे विविध प्रयोग दाखवण्यात आले आहेत. आज अंधश्रद्धेमुळे समाज काहीही करू लागला आहे, यामुळे समाजाची पायमल्ली होतांना दिसून येत आहे. अंधश्रद्धेला कोणता शास्त्रीय आधार नाही अंधश्रद्धा ही गैरसमजातून निर्माण होत असते.

**१०) नैसर्गिक साधन संपतीचे संवर्धन :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातून नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन केले जात असते. निसर्गांने मानवाच्या विकासासाठी अनेक चागल्या गोष्टीं दिल्या आहेत त्याचे जतन करण्याची महत्त्वाची जबाबदारी ही मानवाची असल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातून नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन केले जात असते.

**११) व्यसनमुक्ती कार्यक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातून समाजजागृती व प्रबोधनाचे विविध कार्यक्रम आयोजित केली जात असतात. त्यामध्ये व्यसनमुक्ती विरोधी जनजागृती करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. विशेष शिबिरातील विविध व्याख्यानातून व्यसनाचे दुष्परिणामाविषयी प्रकाश टाकले जात असते.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद (२०१०): *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे पृ.क्र.३२

२) Ghorpade, Nitin (2008): *Administration and Management of National Service Scheme*, Prafulata Publication, pune. page no.११४

३) फुलवाडकर, दिनानाथ, *नाविन्यपूर्ण उपक्रम*, मोटे, नागनाथ (संपा), *राष्ट्रीय सेवा योजना*, श्रमतीर्थ द्विवार्षिकांक, (१९९७-९९), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.१३

४) कच्छवे, एम, *राष्ट्रीय सेवा योजना- व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास*, पवार, डी, (संपा), राष्ट्रीय सेवा योजना, *श्रमतीर्थ द्विवार्षिकांक*, (२००८-२०१०), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.१९८

५) टिपरसे, अशोक, *युवकांना घडवणारी आणि सामाजिक कार्य करणारी राष्ट्रीय सेवा योजना*, पवार, डी, (संपा), *राष्ट्रीय सेवा योजना*, श्रमतीर्थ द्विवार्षिकांक, (२००६-२००८), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.२०६

६) उपरोक्त, चाकने, संजय व पाब्रेकर, *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना*, पृ.क्र.९६

७) कित्ता पृ.क्र.१३४